**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ५२ खालील आदेश.**
**रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर**
**आदेश पारित दिनांक ०१.०२.२०२३**

---

वादीतर्फे प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे निशाणी क्र. ५३ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे हे दिनांक २९.०७.२०२२ रोजी मयत झाले आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी यांना प्रतिवादी क्र. १ यांच्या मृत्यूची माहिती उशीरा झाल्याने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला व त्याचेविरुध्द ॲबेटमेंटचा हुकूम झाला आहे त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

०३. सदरकामी, प्रतिवादीतर्फे असे म्हणणे दाखल की, सदरकामी वादीने वारस रेकॉर्डवर घेणेसाठी २ महिन्यांपेक्षा जास्त उशीर केला आहे. तरी सदरीकामी वादीस कॉस्ट करून अर्ज मंजूर व्हावेत.

०४. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे योग्य वाटते. तसेच, मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणे न्यायोचित वाटते. परंतु, प्रस्तूत अर्ज दाखल करणेस वादीस विलंब झाल्याने प्रस्तूत अर्जावर कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने

योग्य वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादींचा निशाणी क्र. ५२ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टची आकारणीवर मंजूर करणेत येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी.

२. मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

(अ. क. दामटे)
दिनांकः- ०१.०२.२०२३                    दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.